ePaper
# मंत्रिमंडळ विस्तार नागपूर अधिवेशनापूर्वी; मुख्यमंत्री फडणवीस यांचे संकेत

वर्ष - 8 । अंक -148 | UDYAM-MH-26-0158827



महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 06 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आझाद मैदानावर शानदार शपथविधी सोहळा

# पुन्हा आले ‘देवेंद्र पर्व’!

### » मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार विराजमान

। मुंबई । महाईन्यूज

**विधानसभा निवडणुकीत बहुमत मिळवल्यानंतर महायुतीचा थपथविधी सोहळा पार पडाला. राज्याचे मुख्यमंत्री म्हणून भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांनी, तर उपमुख्यमंत्रीपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी शपथ घेतली. मुंबईतील आझाद मैदान येथे हा भव्य सोहळा पार पडाला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह अनेक दिग्गजांनी हजेरी लावली होती. राजकीय क्षेत्राबरोबरच क्रीडा, चित्रपट आणि उद्योग जगतातील अनेक मान्यवर देखील या शपथविधी सोहळ्याला उपस्थित होते.**





राष्ट्रगीताने या शपथविधीच्या भव्य सोहळ्यांची सांगता झाली. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यासाठी आझाद मैदानावर जाण्यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी आईचे आशीर्वाद घेतले. आईने देवेंद्र फडणवीसांचे औक्षण केले. या भावनिक क्षणाचा फोटो देवेंद्र फडणवीस यांनी शेअर केला असून, मायेचे औक्षण! आईच्या आशीर्वादाने नव्या पर्वाचा आरंभ..., असे कॅप्शन दिले आहे.

### शपथविधी सोहळ्याला दिग्गजांची हजेरी...

शपथविधीच्या कार्यक्रमाला उपस्थित राहाणाऱ्यांमध्ये अभिनेता शाहरूख खान आणि सलमान खान हे दोघं पहिले होते. यासंबंधीचे व्हिडीओ देखील समोर आले आहेत. ज्यामध्ये शाहरूख खान आणि सलमान खान एकमेकांची गळाभेट घेताना पाहायला मिळत आहेत.

तर दुसऱ्या एका व्हिडीओमध्ये शाहरुख खान हा रिलायन्स इंडस्ट्रीजचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी आणि त्यांचा मुलगा अनंत अंबानी यांच्यासोबत बसलेला दिसत आहे. याशिवाय संजय दत्त, रणवीर सिंह, रणबीर कपूर, माधुरी दीक्षित नेने, जॅकी श्रॉफ आणि अर्जून कपूर या कलाकारांनी देखील देवेंद्र फडणवीस याXच्या शपथविधी सोहळ्याला हजेरी लावली. माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर याने देखील या सोहळ्याला हजेरी लावली.

अमृता फडणवीस काय म्हणाल्या? देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे तिसऱ्यांदा मुख्यमंत्री बनले आहेत, याबद्दल प्रतिक्रिया देताना अमृता फडणवीस म्हणाल्या की, “देवेंद्र फडणवीस सहाव्यांदा आमदार झाले आणि तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होत आहेत, याबद्दल खूप आनंद वाटतो. पण आनंदापेक्षा एका जबाबदारीची आम्हाला जाणीव आहे.



मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस यांचे नाव निश्चित

केंद्रात नरेंद्र अन् राज्यात देवेंद्र!

» महायुतीचा पॅटर्न : एकनाथ शिंदे, अजित पवार उपमुख्यमंत्रीपदी

। मुंबई । महाईन्यूज ।

महायुतीचं अखेर ठरलं आहे, मुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस विराजमान होतील असे संकेत आहेत एकनाथ शिंदे आणि अजित पवार असे दोन उपमुख्यमंत्री असतील अशी शक्यता आहे. महायुतीला प्रचंड यश मिळाल्यानंतर मुख्यमंत्री कोण होणार याच्या विविध चर्चा सुरु होत्या. मात्र आता देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतील, अशी विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.

### देशात नरेंद्र अन् राज्यात देवेंद्र...!

दि.२६ नोव्हेंबर रोजी राजकीय घडामोडींचा अंदाज घेत ‘महाईन्यूज’ ने “केंद्रात नरेंद्र अन् राज्यात दवेंद्र” असे राजकीय भाष्य करणारे वृत्त प्रसिद्ध केले होते. त्यानंतरच्या काळात अनेक नावे मुख्यमंत्रीपदासाठी चर्चेत आली. अखेर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आणि ‘महाईन्यूज’च्या वृत्ताला पुष्टी मिळाली.

> तमाम महाराष्ट्रातील जनतेपुढे नतमस्तक होऊन राज्याला नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी वचनबद्ध राहील. महाराष्ट्र आता थांबणार नाही. मला बदल्याचे नाही तर बदल दाखवेल, असे राजकारण करायचे आहे. जनतेने प्रचंड असे बहुमत दिले आहे. त्यामुळे जनतेला स्थिर सरकार देणे ही आमची जबाबदारी आहे.”
>
> -देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

> मुख्यमंत्री असताना मी कार्यकर्ता म्हणून काम केलं. जेव्हा मी CM होतो तेव्हा मी COMMON MAN समजत होते. पण आता मी DCM आहे. आता माझी जबाबदारी मुख्यमंत्र्यांसोबत काम करण्याची आहे. म्हणजेच DEDICATED TO COMMON MAN.
>
> -एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री.

> महायुती सरकार राज्याला विकासाच्या वाटेवर नव्या उंचीवर घेऊन जाईल, यात काही शंका नाही. राजकीय, आर्थिक, सामाजिक, कृषी, शैक्षणिक, सांस्कृतिक, औद्योगिक यांसारख्या सर्वच क्षेत्रांत तुमचं-आमचं सरकार मोलाची भूमिका बजावेल, अशी हमी देतो. सर्व समाजघटकाच्या सर्वांगीण विकासासाठी हे हक्काचं सरकार सदैव कटिबद्ध राहील.
>
> -अजित पवार, उपमुख्यमंत्री.

## पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री पुन्हा दादाच?

# विक्रमवीर ‘डेप्युटी सीएम’!

## राजकारण : अजित पवारांचा उपमुख्यमंत्रीपदी ‘षटकार’

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रात आजपासून पुन्हा एकदा देवेंद्र पर्व सुरु झाले. मुंबईतील आझाद मैदानावर आयोजित केलेल्या सोहळ्यात देवेंद्र फडणवीस यांनी आज (दि.५) तिसऱ्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. ते आता राज्याचे २१ वे मुख्यमंत्री बनले आहेत. तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदी शपथ घेतली.**



राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत शपथविधी सोहळा पार पडला. विशेष म्हणजे ६५ वर्षीय अजित पवार (Ajit Pawar deputy CM Maharashtra) यांनी आज सहाव्यांदा उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यामुळे राज्यात सर्वाधिक सहावेळा उपमुख्यमंत्री झालेले ते पहिले नेते ठरले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील आझाद मैदानावर शपथविधी सोहळा पार पडला. यावेळी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, केंद्रीय केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे, केंद्रीय मंत्री पियुष गोयल, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, उत्तर प्रदेशचे योगी आदित्यनाथ, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्रभाई पटेल, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, भारतरत्न सचिन तेंडुलकर, उद्योगपती मुकेश अंबानी, अनिल अंबानी, अनंत अंबानी, अभिनेता शाहरुख खान, अभिनेता सलमान खान, अभिनेता रणबीर कपूर,अभिनेता रणवीर सिंग, अभिनेता रितेश देशमुख, अभिनेत्री माधुरी दीक्षित, अभिनेत्री विद्या बालन यांची प्रमुख उपस्थिती होती.

### सहाव्यांदा उपमुख्यमंत्री

अजित पवार पहिल्यांदा १९९१ मध्ये पहिल्यांदा महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले होते. अजित पवार बारामती मतदारसंघाचे १९९१ पासून प्रतिनिधित्व करीत आहेत. सलग आठ वेळा ते बारामतीतून निवडून गेले आहेत. अजित पवार नोव्हेंबर २०१० ते सप्टेंबर २०१२, ऑक्टोबर २०१२ ते सप्टेंबर २०१४, २३ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर २०१९ (पहाटेचा शपथविधी), डिसेंबर २०१९ ते जून २०२२, जुलै २०२३ ते नोव्हेंबर २०२४ या काळात अजित पवार उपमुख्यमंत्रीपदी राहिले. आज गुरुवार ५ डिसेंबर २०२४ रोजी त्यांनी सहाव्यांदा उपमुख्यमंत्रीपदी शपथ घेतली.

### पहाटेचा शपथविधी

नोव्हेंबर २०१९मध्ये राज्यात सत्ता कोणी स्थापन करायची? हा पेच निर्माण झाला होता. तत्कालीन शिवसेना आणि भाजप युतीत मतभेद तीव्र झाले होते आणि शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांनी एकत्र येत सत्ता स्थापन करण्याच्या हालचाली सुरू केल्या होत्या. याचदरम्यान, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी एकत्र येत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. महाराष्ट्राच्या राजकारणात ‘पहाटेचा शपथविधी’ म्हणून ही घटना लक्षात राहिली. बंडाला आपला पाठिंबा नसल्याचे जाहीर केल्यानंतर अवघ्या ८० तासांतच फडवणीस यांना राजीनामा द्यावा लागला.


---

## जुन्नरच्या आंब्याला नवी ओखळ “शिवनेरी हापूस मँगो”

## व्यापार जगत: दहा वर्षांपासून सुरू असलेल्या लढ्याला अखेर आता यश

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**जुन्नरकरांसाठी आनंदाची बातमी आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या प्रयत्नांना अखेर यश आलं आहे. जुन्नरच्या हापूस आंब्याला अखेर नवी ओळख मिळाली आहे. जुन्नर भागातील या हापूस आंब्याला “शिवनेरी हापूस मँगो” असं जीआय मानांकन मिळालं आहे.**



कोकणात देखील हापूस आंब्याचं उत्पादन होतं. त्यामुळे हापूस या नावावरून वाद सुरू होता. त्यामुळे जुन्नर परिसरात उत्पादीत या आंब्याला हापूस अशी ओळख मिळत नव्हती. मात्र या आंब्याला नवी ओळख मिळावी यासाठी दहा वर्षांपासून सुरू असलेल्या लढ्याला अखेर आता यश आलं आहे. जुन्नरच्या हापूस आंब्याला अखेर नवी ओळख मिळाली आहे. जुन्नर भागातील या हापूस आंब्याला आता “शिवनेरी हापूस मँगो” असं जीआय मानांकन मिळालं आहे. त्यामुळे जुन्नरकरांकडून समाधान व्यक्त होतं. जुन्नरच्या हापूस आंब्याला नवी ओळख मिळावी, जीआय मानांकन मिळावं यासाठी गेल्या दहा वर्षांपासून नारायणगाव कृषी विज्ञान केंद्राकडून प्रयत्न सुरू होते. मात्र हापूस या नावावरून वाद सुरू असल्यानं जीआय मानांकन मिळण्यास अडचण येत होती, मात्र या लढ्यात अखेर आता यश आलं आहे. जुन्नर आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम भागात प्राचीन काळापासून हापूस आंब्याचे उत्पादन घेतले जाते. हे आंबे देखील त्यांच्या चवीसाठी आणि रंगासाठी प्रसिद्ध आहेत.

### 115 वर्षांपूर्वीच्या झाडाची नोंद

जुन्नरमध्ये उत्पादीत होणाऱ्या या हापूस आंब्याला जीआय मानांकन मिळावं यासाठी गेल्या दहा वर्षांपासून नारायणगाव कृषी विज्ञान केंद्राकडून प्रयत्न सुरू होते. त्यासाठी ११५ वर्षांपूर्वीच्या झाडाची नोंद करून, शास्त्रीय पद्धतीने तपासणी करण्यात आली. त्यानंतर जुन्नरच्या हापूस आंब्याला जीआय मानांकन मिळालं आहे. आता जुन्नरचा हापूस हा “शिवनेरी हापूस मँगो” म्हणून ओळखला जाणार आहे.

### शिवनेरी हापूस मँगोचे वैशिष्ट्य

शिवनेरी हापूस आंबा हा ‘हापूस’ या नावाच्या मँगो प्रकाराचा एक श्रेष्ठ प्रकार आहे. या आंब्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची गोडसर, आंबट आणि हलकी चव. हे आंबे साधारणतः पिवळ्या रंगाचे, लहान आकाराचे आणि अत्यंत मऊ असतात. त्याची गंधही खूप आकर्षक असतो. शिवनेरी हापूस आंब्याच्या पोहण्याची कला हा एक महत्त्वाचा घटक आहे. या आंब्याचा आकार व पोत जगभरातील लोकांसाठी आकर्षक आहे.

## वाहनचालकांनी बेशिस्तपणा आता चालणार नाही

# ‘नो पार्किंग’मधील वाहनांवर ‘फाईन’

### कारवाईसाठी ‘टोइंग व्हॅन’ दाखल : वाहतूक शाखेकडून नियमांचा ‘दंडुका’

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत रस्त्यावर ‘नो पार्किंग’मध्ये वाहन पार्क केल्यास आता चांगलेच महागात पडणार आहे. पिंपरी चिंचवड वाहतूक पोलिसांकडून आता अशा वाहनांवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. वाहतूक शाखेकडून आता २५ टोइंग व्हॅन या कारवाईसाठी दाखल झाले आहेत. पोलिसांकडून आता अशा दुचाकी आणि चार चाकी वाहनांवर दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याची माहिती वाहतूक शाखेचे पोलीस आयुक्त बापू बांगर यांनी दिली आहे.**



पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात चाकण, भोसरी, तळेगाव हि औद्योगिक क्षेत्रे तसेच हिंजवडी, तळवडे, ही आयटी पार्क क्षेत्रे असुन देहु व आळंदी हि संतांची भुमी असुन पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत मोठमोठ्या बाजारपेठा तसेच शैक्षणीक व व्यापारी संकुले असुन नामांकित अशी हॉस्पीटल्स आहेत. पिंपरी चिंचवड आयुक्तालयातर्गत दुचाकी तसेच चारचाकी वाहनांचा वापर करणाऱ्या नागरीकांची संख्या मोठ्या प्रमाणात असून नागरीक आपली दैनंदिन कामे करण्या करिता त्यांचे दुचाकी व चारचाकी वाहनांचा वापर करत असतात.

#### कारवाईसाठी वाहने वाढवणार...

पिंपरी चिंचवड शहरात नागरीक ठिकठिकाणी आपले दुचाकी तसेच चारचाकी वाहने अस्ताव्यस्तपणे तसेच बेकायदेशीरपणे दिसेल त्या ठिकाणी पार्क करत असल्याने वाहतुक कोंडीत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयांतर्गत ‘टोईंग व्हॅन’द्वारे कारवाई सुरू करण्यात येत आहे. बेकायदेशीर व वाहतुकीस अडथळा होईल अशी पार्किंग करण्यात आलेली वाहने दंड आकारुन टोईंग करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार आहे. सदर कारवाहीसाठी एकुण २५ वाहने वापरण्यात येणार असून पहिल्या टप्प्यामध्ये एकुण ०८ वाहने वापरण्यात येत असून टप्याटप्याने व आवश्यकतेनुसार वाहनांची संख्या वाढवण्यात येत आहे.

#### इतका दंड आकारण्यात येणार..

दुचाकी वाहन टोईंग केल्यास सदर वाहनांस ५०० रु दंड व २०० रु टोईंग चार्ज आकारण्यात येणार असून ३६ रुपये जी.एस.टी असा एकुण ७३६/- रुपये दंड आकारण्यात येणार आहे. तसेच चारचाकी वाहनांकरीता ५०० रुपये दंड व ४०० रुपये टोईंग चार्ज आकारण्यात येणार असून ७२ रुपये जी.एस.टी असा एकुण ९७२/- रुपये एवढा दंड आकारण्यात येणार आहे. तसेच टोईंग कारवाई केलेल्या वाहनांवर पुर्वीचे चलन प्रलंचित असेल तर प्रलंबित चलनापैकी किमान एक चलन हे टोईंग वेळच्या चलनासोबत भरणे बंधनकारक असणार आहे.तरी नागरीकांनी आपली वाहने बेकायदेशीरपणे व वाहतुकीस अडथळा होईल याप्रमाणे न लावता योग्यरितीने पार्क करावेत असे आवाहन पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी केले आहे.

---

## पवना धरणात २ तरुणांचा बुडून मृत्यू

### निष्काळजीपणा नडला; लोणावळा पोलिसांची माहिती : बोट घेऊन फेरफटका मारण्यासाठी गेले

। पिंपरी । पवनानगर
महाईन्यूज

**पवनाधरण परिसरातील दुधिवरे गावाच्या हद्दीमध्ये बुधवार (दि.४ ) रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास पवनाधरण परिसरात फिरण्यासाठी गेलेल्या दोन पर्यटकांचा बोट उलटल्याने मृत्यू झाला आहे.**



पवनाधरण जलाशयात मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर बोटी फिरत असून त्याकडे कोणत्याही प्रकारचा परवाना आणि नोंदणी क्रमांक देखील नाहीत. मयूर रविंद्र भारसाके (वय २५) तर तुषार रविंद्र अहिरे (वय.२६ दोघेही सध्या रा.पुणे, मुळ,रा.लालजैन मंदिराच्या पाठिमागे, पद्मावती नगर,वरणगांव,भुसावळ)असे बुडून मृत्यू झालेल्यांची नावे असून ते बालेवाडी येथे एका खाजगी कंपनीमध्ये नोकरी करत होते.

लोणावळा ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बालेवाडी पुणे येथील स्केन रियालिटी प्राव्हेट लिमिटेड या खाजगी कंपनी मध्ये काम करणारे सुमारे ८ मित्र पवना धरण लगत असलेल्या दुधिवरे येथील एका हॉटेल वर फिरण्यासाठी आले होते. यामधील काहीजण पवनाधरणाच्या पाण्यात दुपारी ०४:०० वाजण्याच्या सुमारास बोट घेऊन पाण्यामध्ये फेरफटका मारण्यासाठी गेले. ती उलटल्यामुळे दोघांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला.

त्यांना वाचविण्यासाठी शिवदुर्ग रेस्क्यू टिम व मावळ वन्य जीव रक्षक यांच्या वतीने धरणात बुडालेल्या दोन पर्यटकांचा शोध सुरु केल्यानंतर बुधवार ( दि.४ रोजी ) संध्याकाळी आठ च्या सुमारास एकाचा मृतदेह मिळून आला. त्यानंतर रात्री अंधार झाल्यामुळे शोधकार्य बंद करण्यात आले व गुरुवार दि.५ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास शोधकार्य सुरु केले व दुपारी ०२:३० वाजण्याच्या सुमारास दुसरा मृतदेह मिळून आला.

यानंतर श्वच्छदेनेसाठी खंडाळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नेण्यात आला असून पुढील तपास लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत आवारे, युवराज बनसोडे, सिताराम बोकड, नवनाथ चपटे, नितीन कदम हे करत आहे.

#### लाईफ जॅकेट घातले नव्हते

मिळालेल्या माहितीनुसार तरुणांनी कोणीही लाईफ जॅकेट घातलेले नव्हते. त्यामुळे लोणावळा ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी खंडाळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवीला असून या प्रकरणी हॉटेल मालकांवर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.

#### कडक कारवाईची मागणी

पवनाधरण परिसरात असे अनेक पर्यटक पर्यटनासाठी येत असतात. परंतु बोट मध्ये जीवरक्षक उपकरणे नसतात. दरवर्षी पवनाधरणात अशा अनेक दुर्घटना घडतात ज्यात पर्यटकांना जीव गमवावा लागतो. परंतु यांच्यावर पवनाधरण, मत्स्य विभाग किंवा स्थानिक पोलिसांनी कोणतीही कारवाई केलेली नाही. तसेच बेकायदेशीरपणे बोट चालकांनवर बुधवार च्या दुर्घटनेनंतर स्थानिक प्रशासनाने बेकायदेशीर बोट चालवणाऱ्यांवर कडक कारवाई




# सामाजिक समतेसाठी लढणारे - डॉ. आंबेडकर

**महाडच्या चवदार तळयातील सर्वांसाठी म्हणजेच अस्पृश्यांना पाणी मिळत नव्हते. पाणी म्हणजे जीवन, तेच त्यांच्यापासून हिरावून घेतले यासाठी सत्याग्रह करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. मार्च 1927 रोजी सत्याग्रही तळयाकडे निघाले. माणुसकीचे हक्क व निसर्गाची देणगी जे पाणी, ते मिळवायचेच एवढयासाठी चालेले होते. डॉ. आंबेडकर सर्वांच्या पुढे होते.**

अस्पृश्य म्हणून मुंबईच्या कॉलेजात ज्यांनी पाण्याचे हाल सोसले, बडोद्याच्या हॉटेलमध्ये ज्यांनी मार खाल्ला ते खरोखरच सत्याग्रहींचे सेनापती शोभत होते. सर्वजण तळयाजवळ येऊन पोहोचले, प्रथमत: त्यांनी पाण्याचा घोट घेऊन इतरांना पाणी पिण्याची मोकळीक दिली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जिवन म्हणजे भारतीय जनतेच्या समतेच्या लढयाची अविस्मरणीय गाथा होय. दलितोत्ध्दारक, धर्मसुधारक, प्रकांडपंडीत, समाजशास्त्रज्ञ व संविधानाचे शिल्पकार असे विविध पैलू त्यांच्या जिवनाशी निगडीत आहेत. अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा विचार करता, तत्कालीन सामाजिक, राजकिय प्रश्नांना ते कसे सामोरे गेलेत या प्रश्ना प्रमाणेच राष्ट्रीय एकात्मतेचा विचार ही त्यांनी केला. या सर्व बाबींचा मागोवा घेणे अभ्यासाचा विषय आहे. तेव्हा आपला समाज एक संघ असला पाहिजे, यावर



त्यांचा अधिक भर होता. सर्व समाज शहाणा करुन सोडावा ही त्यांची कल्पना होती. "जे-जे आपणांसी ठावे, ते-ते इतरांशी सांगावे, शहाणे करुनही सोडावे सकल जण" हा रामदासांचा संदेश त्यांनी आचरणात आणला आणि इतरांना सुध्दा सांगीतला, या संदेशाकडे डोळेझाक करुन चालणार नाही. नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळवण्यासाठी 5 वर्षे सतत झगडत राहिले शेवटी 1935 मध्ये नाशिकचे काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करण्यात आले. त्याचवेळी बौध्द धर्म स्विकारणार अशी घोषणा त्यांनी येवले (नाशिक) या ठिकाणी केली. त्या दरम्यान "बहिष्कृत भारत" नावाचे नियतकालिक सुरु केले. आपल्या भारत देशात इंग्रजांचे राज्य होते नंतर 15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला. भारतातल्या लोकांना विशिष्ट पध्दतीने राज्यकारभार करता यावा यासाठी भारताची स्वतंत्र राज्यघटना असणे आवश्यक झाले. त्या दृष्टीने भारतीय विद्वानांची एक घटना (तज्ञ) समिती नियुक्त करण्यात आली. त्यात बॅरी. तेजपाल सप्रु, बॅरी. जयकर आणि बॅरि. आंबेडकर हे होते. परंतु उर्वरित दोन तज्ञांनी नकार दिल्यामुळे पं. जवाहरलाल नेहरुंनी ही जबाबदारी बॅरी. आंबेडकर यांच्यावर सोपविली, ती त्यांनी स्विकृत केली. एवढा मोठा कायदेतज्ञ असलेल्या या महात्म्याचे पूर्वजीवन मात्र अत्यंत वाईट गेले असतांना बेदरकारपणे आगपाखड करता आली असती, पण ती सुध्दा त्यांनी केली नाही. अशावेळी देखील बहिष्कृतांच्या चळवळीला वर्ग लढयाचे स्वरुप येणे सहज शक्य होते, त्यातून भारतीय एकसंघतेला तडा जाऊन धर्माच्या नांवावर या देशाची शकले झाली. तशी परिस्थिती उद्भवली असती परंतू "भारतीय" हा त्यांचा स्थायीभाव होता. भारतीय समाजात त्यांना बदल हवा होता पण त्यासाठी समाजप्रबोधन हाच मार्ग होय, अशी त्यांची दृढनिष्ठा होती. त्यामुळेच राष्ट्रनिष्ठा त्यांनी कधी सोडली नाही. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार त्यांनी सर्वात महत्वाचा मानला.स्वत: बरोबर इतरांचा विचार करुन त्यांनी राष्ट्रनिष्ठे पुढे इतर निष्ठा गौण मानल्या. आपण सर्व भारतीय आहोत ही भावना रुजविणे व वाढविणे महत्वाचे आहे. या निष्ठेला कोणतीही निष्ठा स्पर्धा करु शकत नाही. संकुचित जातीय, धार्मीक किंवा राजकिय व अन्य स्वार्थासाठी त्यांनी राष्ट्रनिष्ठा सोडली नाही. त्यांची ही भावना स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेत सहभागी होतांना, कायदामंत्री असतांना रिपब्लीकन पक्ष काढतांना, धर्मांतराची घोषणा करतांना अशा महत्वाच्या जीवनप्रसंगी सतत जागी राहिल्याचे दिसेल. त्यामुळे खऱ्या अर्थाने त्यांना राष्ट्रपुरुष संबोधले पाहिजे. खरोखरच डॉ. आंबेडकरांना वगळून हा देश मोठा झाला असता काय ? याचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे. त्यांनी अहोरात्र कष्ट करुन मोठया कष्टाने आपल्या अंगी असलेली सगळी बुध्दिमत्ता प्राणपणाला लावून 2 वर्षे 11 महिने 17 दिवसात घटना लिहून पुर्ण केली.

## प्रासंगिक »

# वाचन व्यासंगी

***स्वकष्टाने, स्वतःच्या बुध्दिमत्तेने व कर्तृत्वाने संपादन केलेली प्रचंड शक्ती म्हणजे डॉ. आंबेडकर होय. अस्पृश्यांच्या अनन्वित छळातून बाहेर पडलेला तो ज्वालामुखी होता.***

आपल्या एका आयुष्यात एवढी किमया करणारी, सर्वसामान्य लोकांमधील स्वाभिमान जागा करून त्यांना लढ्यासाठी उद्युक्त करणारी व्यक्ती असेही आंबेडकरांना म्हणता यईल. विद्वत्तेने, कर्तृत्वाने,कीर्तीने त्यांनी भारतातील सर्व पुढाऱ्यांना मागे टाकले! सर्वव्यापी कार्य असणारे, डॉ आंबेडकर बहुआयामी व्यक्तिमत्वाचे धनी होते. त्यांच्या ग्रंथप्रेम आणि वाचन व्यासंगाविषयी जाणून घेऊया.डॉ. आंबेडकराना प्रचंड वाचन वेड होतं. ते जगातील सर्वश्रेष्ठ वाचकांपैकी एक होते. इंग्लडमध्ये शिकत असताना तेथील ब्रिटिश म्युझियममध्ये वाचण्यासाठी ते जात असत. या ठिकाणी घडलेला सँडविचचा किस्सा सर्वपरिचित आहेच. तिथे दुपारी काहीही न खाता ते 12 तास वाचन करीत. केवढा तरी कष्टाळू व निश्चयी स्वभाव! ज्ञानाची भूक शमविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी अशाप्रकारे पोटाची भूक मारून टाकली.

आज ६ डिसेंबर, २०२४, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिन, त्यानिमित्त त्यांच्या स्मृतीला आणि विचारांना विनम्र अभिवादन व कोटी कोटी प्रणाम.डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील अद्वितीय बुद्धिमत्तेचे विद्वान होते. म्हणूनच त्यांना *"ज्ञानाचे प्रतीक" (सिम्बॉल ऑफ नॉलेज)* म्हणून संबोधले आहे.

# अभिप्रेत लोकशाही वर्तमान स्थिती...!

तसेच ते जागतिक कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, इतिहासतज्ज्ञ, संशोधक, भाषातज्ज्ञ, विधिज्ञ, कायदेतज्ञ, शिक्षणतज्ज्ञही होते. त्यांनी शेतकरी, कष्टकरी, स्त्रिया, शोषित, पिडीत, सर्वहारा वर्गासाठी अद्वितीय संघर्ष केला. ते म्हणाले होते की, *"माझ्या लोकांच्या न्याय्य हक्कांसाठी रस्त्यावरील कंदिलाच्या खांबावर कोणी फाशी दिली तरी त्याची मला पर्वा नाही."* स्वजनांच्या उद्धाराचा एवढा दृढसंकल्प त्यांचा होता आणि त्यांनी आपल्या असीम त्यागातून व जाज्वल्य संघर्षातून तो सिद्ध केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाहीचे कट्टर समर्थक होते. त्यांचा लोकशाहीच्या न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांवर दृढ विश्वास होता. ही तत्त्वे मानवी जीवनाची मूलतत्त्वे व्हावी असा त्यांचा आग्रह होता. म्हणूनच जेव्हा त्यांना भारतीय संविधान निर्माण करण्याची जबाबदारी व संधी मिळाली तेव्हा त्यांनी ही



तत्त्वे भारतीय संविधानाची मूलतत्त्वे म्हणून स्वीकारली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी २२ डिसेंबर, १९५२ रोजी पुणे येथे आपल्या भाषणात, *"रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणणाऱ्या शासन व्यवस्थेच्या प्रकारास आणि पद्धतीस लोकशाही म्हणतात".* ("A FORM AND METHOD OF GOVERNMENT WHEREBY REVOLUTIONARY CHANGES IN THE ECONOMIC AND SOCIAL LIFE OF THE PEOPLE ARE BROUGHT ABOUT WITHOUT BLOODSHED.") अशी लोकशाहीची व्याख्या केली आहे. त्यांची ही व्याख्या संपूर्ण मानवी विकासाच्या ध्येयाला कवेत घेणारी दिसून येते. आर्थिक लोकशाही साध्य करण्यासाठी राजकारण विरहीत आर्थिक प्रक्रिया, समाजात आर्थिक विषमतावादी सत्तेचा अभाव, आर्थिक निर्णय प्रक्रियेत लोकांचा सहभाग, सार्वजनिक खर्च, समाजवादी आणि मिश्र अर्थव्यवस्था, अनुकूल आर्थिक संस्था, कमीत कमी आर्थिक विषमता या अटींची पूर्तता आवश्यक असते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीची व्याख्या करतांना लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात क्रांतीकारक बदल घडवून आणणारे शासन म्हणजे लोकशाही असे म्हटले आहे. कारण जर प्रत्येक घटकाचा आर्थिक आणि सामाजिक विकास होत नसेल तर हा उपेक्षित समाज लोकशाहीचा डोलारा उध्वस्त करेल अशी त्यांनी साधार भीती व्यक्त केली होती. म्हणून जर राजकीय लोकशाही यशस्वी करायची असेल तर तिला आर्थिक लोकशाहीची जोड असलीच पाहिजे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥


आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.


# महाराष्ट्राला लाभलेले आतापर्यंतचे मुख्यमंत्री!


1 यशवंतराव चव्हाण
कार्यकाळ – १ मे १९६० ते १९ नोव्हेंबर १९६२
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस


2 मारोतराव कन्नमवार
२० नोव्हेंबर १९६२ ते २४ नोव्हेंबर १९६३
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस


3 वसंतराव नाईक
५ डिसेंबर १९६३ ते २० फेब्रुवारी १९७५
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस



4 शंकरराव चव्हाण
२१ फेब्रुवारी १९७५ ते १७ मे १९७७
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस


5 वसंतदादा पाटील
१७ मे १९७७ ते १८ जुलै १९७८
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस


6 शरद पवार
१८ जुलै १९७८ ते १७ फेब्रुवारी १९८०
पार्टी – पुरोगामी लोकशाही दल


7 अब्दुल रहमान अंतुले
९ जून १९८० ते १२ जानेवारी १९८२
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस


8 बाबासाहेब भोसले
२१ जानेवारी १९८२ ते १ फेब्रुवारी १९८३
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस


9 वसंतदादा पाटील
२ फेब्रुवारी १९८३ ते १ जून १९८५
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस


10 शिवाजीराव पाटील
३ जून १९८५ ते ६ मार्च १९८६
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस


11 शंकरराव चव्हाण
१२ मार्च १९८६ ते २५ जून १९८८
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस



12 शरद पवार
२६ जून १९८८ तै २५ जून १९९१
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस


13 सुधाकरराव नाईक
२५ जून १९९१ ते २२ फेब्रुवारी १९९३
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस


14 शरद पवार
६ मार्च १९९३ ते १४ मार्च १९९५
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस


15 मनोहर जोशी
१४ मार्च १९९५ ते ३१ जानेवारी १९९९
पार्टी – शिवसेना


16 नारायण राणे
१ फेब्रुवारी १९९९ ते १७ ऑक्टोबर १९९९
पार्टी – शिवसेना


17 विलासराव देशमुख
१८ ऑक्टोबर १९९९ ते १६ जानेवारी २००३
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस


18 सुशीलकुमार शिंदे
१८ जानेवारी २००३ ते ३० ऑक्टोबर २००४
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस


19 विलासराव देशमुख
२६ जून १९८८ तै २५ जून १९९१
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस


20 अशोक चव्हाण
५ डिसेंबर २००८ ते ९ नोव्हेंबर २०१०
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस


21 पृथ्वीराज चव्हाण
१० नोव्हेंबर २०१० ते २६ सप्टेंबर २०१४
पार्टी – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस





22 देवेंद्र फडणवीस
३१ ऑक्टोबर २०१४ ते ८ नोव्हेंबर २०१९
पार्टी – भारतीय जनता पार्टी


23 देवेंद्र फडणवीस
२३ नोव्हेंबर २०१९ ते २८ नोव्हेंबर २०१९
पार्टी – भारतीय जनता पार्टी


24 उद्धव ठाकरे
२८ नोव्हेंबर २०१९ ते २९ जून २०२२
पार्टी – शिवसेना


25 एकनाथ शिंदे
३० जून २०२२
पार्टी – शिवसेना


26 देवेंद्र फडणवीस
५ डिसेंबर २०२४
पार्टी – भाजपा

# राज्यातील ७५५ केंद्रांवर मतपडताळणी

## विरोधकांची 'ईव्हीएम'विरोधात आक्रमक भूमिका, 104 अर्ज आल्याची निवडणूक आयोगाची माहिती

। मुंबई ।
विशेष प्रतिनिधी। महाईन्यूज

**यंदाच्या विधानसभा निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला. त्यापैकी अनेकांनी 'ईव्हीएम' आणि व्हीव्हीपॅट पडताळणीसाठी अर्ज केले असून, त्यात बाळासाहेब थोरात, विनोद घोसाळकर, फहाद अहमद, श्रद्धा जाधव, माणिकराव ठाकरे, संग्राम थोपटे, बाळाराम पाटील, राम शिंदे, संजय जगताप, राजेश टोपे, रोहिणी खडसे आदींचा समावेश आहे.**



राज्यात 'ईव्हीएम'वरून विरोधकांचे आरोपसत्र कायम असून, 'ईव्हीएम'मधील मते आणि 'व्हीव्हीपॅट' पावत्यांच्या पडताळणीची मागणी विरोधक करीत आहेत. राज्यात ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या मायक्रो कंट्रोलरच्या तपासणीसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडे १०४ अर्ज प्राप्त झाल्याची माहिती आयोगाने गुरुवारी दिली. राज्यातील ७५५ मतदान केंद्रांवरील 'ईव्हीएम'मधील मते आणि 'व्हीव्हीपॅट'च्या पावत्यांची तपासणी करण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालावर आक्षेप घेत विरोधकांनी 'ईव्हीएम'विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. अनेकांनी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती. राज्यातील ३१ जिल्ह्यांतील एकूण ९५ विधानसभा मतदारसंघांत 'ईव्हीएम- व्हीव्हीपॅट'ची 'ब्रंट मेमरी' आणि 'मायक्रो कंट्रोलर'च्या तपासणीसाठी आणि पडताळणीसाठी १०४ अर्ज प्राप्त झाले आहेत.

या १०४ अर्जांमधून राज्यातील १ लाख ४८६ मतदान केंद्रांपैकी ७५५ मतदान केंद्रावरील 'ईव्हीएम' संचांच्या तपासणीची मागणी करण्यात आली आहे. राज्यातील ५ जिल्ह्यांत म्हणजेच सिंधुदुर्ग, नंदुरबार, अमरावती, वर्धा आणि गडचिरोली येथे तपासणीसाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नसल्याचे आयोगाने सांगितले.

### पुण्यात सर्वाधिक अर्ज

आयोगाकडे प्राप्त झालेल्या एकूण अर्जांपैकी पुणे जिल्ह्यातून सर्वाधिक अर्ज आले आहेत. पुण्यातील एकूण ११ मतदारसंघांत १३७ 'ईव्हीएम' तपासणीची मागणी करण्यात आली आहे. त्यात शिरूर मतदारसंघातून अशोक पवार, हडपसर मतदारसंघातून प्रशांत जगताप, पुणे कँटोन्मेंट मतदारसंघातून रमेश बागवे, भोर मतदारसंघातून संग्राम थोपटे यांच्यासह अनेकांनी अर्ज केले आहेत.

### मुंबई उपनगरात 64 अर्ज

मुंबई उपनगरातून ६४ आणि मुंबई शहरातून चार ईव्हीएमच्या तपासणीची मागणी निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे. त्यात चांदिवली मतदारसंघातून नसीम खान यांनी २० मशिनच्या तपासणीची मागणी केली असून, कुर्ला मतदारसंघातून प्रवीणा मोरजकर यांनी १० मशिनच्या तपासणीची मागणी केली आहे.

# 'वक्फ'मध्ये महत्त्वाचे बदल नाहीच?

## मूळ विधेयक लोकसभेत संमत होण्याची शक्यता

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**वक्फ दुरुस्ती विधेयकामध्ये आवश्यक बदल सुचवण्यासाठी संयुक्त संसदीय समितीमध्ये (जेपीसी) सखोल चर्चा होत असली तरी, कोणतेही महत्त्वाचे बदल न करता लोकसभेत मूळ विधेयक संमत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**



राज्यांच्या वक्फ मंडळांकडील जमिनीची मालकी निश्चित करण्यासंदर्भात मूळ विधेयकामध्ये ४८ दुरुस्त्या सुचवण्यात आल्या आहेत. त्यातील प्रमुख चार दुरुस्त्यांना 'जेपीसी'च्या बैठकांमध्ये 'इंडिया' आघाडीतील सदस्यांनी तीव्र विरोध केला. वक्फ मंडळावर बिगर मुस्लीम सदस्यांची नेमणूक होणार, वक्फ मंडळांवर निवडणुकीऐवजी नियुक्त्या केल्या जाणार, वक्फची जमीन निश्चित करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना मिळणार आणि वक्फ मंडळाकडील जमिनींची नोंदणीची पूर्वलक्ष्यीप्रभावाने पडताळणी केली जाणार, या चार प्रमुख दुरुस्त्या केंद्र सरकारने विधेयकात समाविष्ट केल्या आहेत. विधेयकातून या दुरुस्त्या काढून टाकण्यास 'जेपीसी'तील सत्ताधारी सदस्यांनी विरोध केला आहे.राज्यातील एका बड्या उद्योजकाला वक्फची जमीन दिली गेली. पूर्वलक्ष्यीप्रभावाने सगळ्या नोंदी आणि व्यवहार पाहिले जाणार असतील तर उद्योजकाशी वक्फ मंडळाने केलेल्या व्यवहाराची चौकशी करणार का, असा सवाल 'जेपीसी'तील सदस्य व शिवसेना-ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी केला. विरोधकांच्या महत्त्वाच्या चार आक्षेपांची दखल घेऊन वक्फ दुरुस्ती विधेयकात बदल केले पाहिजेत, असे सावंत यांनी सांगितले. वक्फच्या जमिनी अनेक ठिकाणी बळजबरीने घेतल्या गेल्या आहेत. त्याविरोधात कारवाई करण्याचे अधिकार सरकारकडे असले पाहिजेत. त्यासाठी जमीन नोंदणीची पडताळणी पूर्वलक्ष्यीप्रभावाने केली पाहिजे, असे मत भाजप खासदार व 'जेपीसी'च्या सदस्या मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केले. 'जेपीसी'तील सदस्यांनी वेगवेगळ्या राज्यांना भेटी दिल्या आहेत. पण, आणखी काही राज्यांना भेट देणे गरजेचे असेल तर आम्ही तिथल्याही संबंधित लोकांशी चर्चा करू, असे कुलकर्णी यांनी सांगितले. 'जेपीसी'चे सदस्य जम्मू-काश्मीर, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आदी राज्यांना भेट देण्याची शक्यता आहे.'जेपीसी'तील काही सदस्यांनी तसेच, बैठकीमध्ये सादरीकरण करणाऱ्या अनेकांनी वक्फ मंडळेच बरखास्त करण्याची सूचना केल्याचे समजते. पण, त्याबाबत 'जेपीसी'मध्ये सविस्तर चर्चा झालेली नाही. शिवाय, केंद्र सरकारच्या स्तरावरही ही सूचना गांभीर्याने घेण्यात आलेली नाही. त्यामुळे 'जेपीसी'च्या अहवालातही वक्फ मंडळाच्या बरखास्तीची शिफारस केली जाण्याची शक्यता नसल्याचेही समजते.राज्यांच्या वक्फ मंडळांकडील जमिनीची मालकी निश्चित करण्यासंदर्भात मूळ विधेयकामध्ये ४८ दुरुस्त्या सुचवण्यात आल्या आहेत. त्यातील प्रमुख चार दुरुस्त्यांना 'जेपीसी'च्या बैठकांमध्ये 'इंडिया' आघाडीतील सदस्यांनी तीव्र विरोध केला. वक्फ मंडळावर बिगर मुस्लीम सदस्यांची नेमणूक होणार, वक्फ मंडळांवर निवडणुकीऐवजी नियुक्त्या केल्या जाणार, वक्फची जमीन निश्चित करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना मिळणार आणि वक्फ मंडळाकडील जमिनींची नोंदणीची पूर्वलक्ष्यीप्रभावाने पडताळणी केली जाणार, या चार प्रमुख दुरुस्त्या केंद्र सरकारने विधेयकात समाविष्ट केल्या आहेत. विधेयकातून या दुरुस्त्या काढून टाकण्यास 'जेपीसी'तील सत्ताधारी सदस्यांनी विरोध केला आहे.राज्यातील एका बड्या उद्योजकाला वक्फची जमीन दिली गेली. पूर्वलक्ष्यीप्रभावाने सगळ्या नोंदी आणि व्यवहार पाहिले जाणार असतील तर उद्योजकाशी वक्फ मंडळाने केलेल्या व्यवहाराची चौकशी करणार का, असा सवाल 'जेपीसी'तील सदस्य व शिवसेना-ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी केला.

### बरखास्तीची शक्यता कमीच!

विरोधकांच्या महत्त्वाच्या चार आक्षेपांची दखल घेऊन वक्फ दुरुस्ती विधेयकात बदल केले पाहिजेत, असे सावंत यांनी सांगितले. वक्फच्या जमिनी अनेक ठिकाणी बळजबरीने घेतल्या गेल्या आहेत. त्याविरोधात कारवाई करण्याचे अधिकार सरकारकडे असले पाहिजेत. त्यासाठी जमीन नोंदणीची पडताळणी पूर्वलक्ष्यीप्रभावाने केली पाहिजे, असे मत भाजप खासदार व 'जेपीसी'च्या सदस्या मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केले. 'जेपीसी'तील सदस्यांनी वेगवेगळ्या राज्यांना भेटी दिल्या आहेत. पण, आणखी काही राज्यांना भेट देणे गरजेचे असेल तर आम्ही तिथल्याही संबंधित लोकांशी चर्चा करू, असे कुलकर्णी यांनी सांगितले. 'जेपीसी'चे सदस्य जम्मू-काश्मीर, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल आदी राज्यांना भेट देण्याची शक्यता आहे.

# सोरॉस संबंधावरून काँग्रेसची कोंडी

## भाजपकडून राहुल गांधी लक्ष्य; गदारोळाने कामकाज तहकूब

। नवी दिल्ली ।
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**अदानी समूहाच्या लाचखोरीच्या चौकशीचा काँग्रेसने तगादा लावल्याने गुरुवारी भाजपने अमेरिकेतील अब्जाधीश गुंतवणूकदार जॉर्ज सोरॉस यांच्या राहुल गांधींशी असलेल्या कथित लागेबांध्याचा मुद्दा संसदेत उपस्थित करून काँग्रेसची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. त्यातून भाजपने काँग्रेसविरोधात नवी आक्रमक रणनीती आखली असल्याचे स्पष्ट झाले आहे.**



सोरॉस यांच्याशी संगनमत करून राहुल गांधी मोदींचे सरकार उलथवून टाकण्याचे कारस्थान करत आहेत. राहुल गांधी हे देशद्रोही आहेत, असा गंभीर आरोप लोकसभेत भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी केला. तर, राहुल गांधी व जॉर्ज सोरॉस दोन शरीर असले तरी त्यांचा आत्मा एकच आहे. हे दोघेही देशाला अस्थिर करत आहेत, असा घणाघाती हल्लाबोल भाजपचे खासदार संबित पात्रा यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत केला.शोध पत्रकारिता करणारी 'ओसीसीआरपी' या आंतरराष्ट्रीय संस्थेला सोरॉस आर्थिक निधी पुरवतात. राहुल गांधी 'ओसीसीआरपी' संस्थेचे हितसंबंध जपतात. या माध्यमातून ते सोरॉसच्याही हितसंबंधाना मदत करत असतात. हेच सोरॉस सातत्याने पंतप्रधान नरेंद्र मोदींविरोधात भाष्य करत असतात. सोरॉस भारतविरोधी असून, त्यांना राहुल गांधी पाठिंबा देतात, अशी टीका पात्रा यांनी केली. पेगॅसिस, कोव्हॅक्सिन लस, हिंडनबर्गचा अहवाल, शेतकऱ्यांसंबंधातील अहवाल असे अनेक वादग्रस्त विषय राहुल गांधी व काँग्रेसच्या नेत्यांनी 'ओसीसीआरपी'ने प्रसिद्ध केलेल्या लेखांनंतरच हाताळले.

### गंभीर विषयांवर चर्चा आवश्यक

या सर्व विषयांमधून राहुल गांधींनी मोदींविरोधात आंदोलनाची भूमिका घेतली. राहुल गांधींची देशविरोधी कृत्ये सोरॉस यांच्या मदतीने केली जात आहेत, असाही आरोप पात्रा यांनी केला.लोकसभेत भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनीही राहुल गांधींना लक्ष्य केले. बांगलादेशमधील हत्यांना जबाबदार असलेले मुश्फिकुल फजल यांना राहुल गांधी अमेरिकेत भेटले.या सगळ्यांनी मोदींना विरोध केला होता. खलिस्तान निर्माण करू पाहणाऱ्या, काश्मीरचे विभाजन करू पाहणाऱ्या या मंडळींना राहुल गांधी अमेरिकेत जाऊन का भेटतात.

# सनीने केला मराठी गाण्यावर जबरदस्त डान्स



बॉलीवूड अभिनेत्री सनी लिओनी तिच्या बोल्ड अंदाजामुळे नेहमी चर्चेत असते. अभिनयाबरोबरच आपल्या वैयक्तिक आयुष्याबद्दलचे अपडेट्स ती सोशल मीडियावर शेअर करताना दिसते. उत्तम डान्सर असलेली सनी लिओनी नुकतीच मराठी गाण्यावर थिरकली होती. सनीचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होताना दिसत आहे. हता दुर्गुळे अभिनीत 'कन्नी' या मराठी चित्रपटातील 'नवरोबा नवरोबा' गाण्यावर सनी हटके डान्स मूव्हज करताना पाहायला मिळतेय. क्रॉप टॉप आणि मिनी स्कर्ट असा को-ऑर्ड सेट तिने या गाण्यासाठी परिधान केला आहे. निळ्या रंगाच्या बूट्स आणि मॅचिंग हॅटची निवड करीत सनीने हा लूक पूर्ण केला आहे.

# राघवन या पात्रासाठी कोणाला घ्यायचं..!

प्रसिद्ध फिल्ममेकर आणि कोरिओग्राफर फराह खानने शाहरुख खानच्या 'मैं हूं ना' या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शनात पदार्पण केले. शाहरुख खानची प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली. या चित्रपटात झायेद खान, सुष्मिता सेन, अमृता राव आणि सुनील शेट्टी यांसारखे दिग्गज कलाकारही मुख्य भूमिकेत होते. फराहने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत या सगळ्यांना एका चित्रपटासाठी एकत्र आणण्यात आलेल्या आव्हानांबद्दल खुलासा केला आहे. या चित्रपटाच्या कास्टिंगसाठी फराह खानला बऱ्याच समस्या आल्या. याबद्दलच तिने मॅशेबल इंडियाच्या 'द बॉम्बे ड्रीम शोम'ध्ये कास्टिंग डायरेक्टर मुकेश छाब्रा यांच्याशी संवाद साधताना खुलासा केला. शाहरुखने एका झटक्यात तिच्या चित्रपटाला होकार दिला, पण इतरांचं कास्टिंग करताना मात्र फराहला खूपच त्रास झाला. झायेद खानच्या भूमिकेसाठी याआधी हृतिक रोशन, अभिषेक बच्चन व सोहेल खान यांना विचारण्यात आलं होतं अन् अमृता रावच्या भूमिकेसाठी प्रथम आयेशा टाकीया ही फराहची पहिली पसंती होती. हे तिने या मुलाखतीदरम्यान स्पष्ट केलं.या चित्रपटातील खलनायक म्हणजेच राघवन या पात्रासाठी कोणाला घ्यायचं हादेखील फराहसमोर एक मोठा प्रश्न होता. या भूमिकेसाठी शाहरुखच्या आग्रहाखातर फराहने कमल हासन यांनाही विचारलं होतं, शाहरुखच्या चित्रपटाला ते नकार देणार नाहीत.

# तुम नज़रें ठीक करो!



प्रसिद्ध अभिनेत्री हेमांगी कवी ही सोशल मीडियावर विविध पोस्ट शेअर करत असते. हेमांगीच्या 'बाई, बुब्स आणि ब्रा' या पोस्टनं अनेकांचे लक्ष वेधलं होते. हेमांगी विविध विषयांवर आधारित पोस्ट शेअर करत असते. आता हेमांगीनं जागतिक महिला दिनानिमित्त खास पोस्ट शेअर केली आहे. हेमांगीनं या पोस्टमध्ये स्वत:चा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये हेमांगी ही खिडकीच्या बाहेर दिसताना दिसत आहे. हेमांगीनं तिच्या या फोटोला खास कॅप्शन देखील दिलं आहे. या कॅप्शनमध्ये तिनं परीतोष त्रिपाठी यांची कविता लिहिली आहे. या कवितेनं अनेकांचे लक्ष वेधलं आहे.पुढे हेमांगीनं पोस्टमध्ये लिहिलं, "परीतोष त्रिपाठी जियो! कल के दौरान आपने ये पंक्तियां पेश की और मेरी आंखें भर आयी. इसमें वो हर एक शब्द है, है, जो मैं पिछले कुछ दिनों से कहना चाहती थी, जोर जोर से चिल्लाना चाहती थी! कुछ लोगों के लिए औरतों की किसी भी क्षेत्र में पायी गयी कोई मायने ही नहीं रखती. ऐसे लोग सिर्फ और सिर्फ उसने कपडे क्या पहने हैं, कैसे पहने हैं इस बात पर वक्त निकाल निकाल के बाते करते हैं, करते हैं, अपना और दुसरों का वक्त जाया करते हैं!के जरीए संस्कृती और सभ्यता के नाम पर हमें फिरसे गुलाम, कमजोर बनाना चाहते हैं!

# राधिकाने चित्रपटातील संवाद केले कॉपी!

मुकेश अंबानी व नीता अंबानी यांचे छोटे सुपुत्र अनंत अंबानी यंदा लग्नबंधनात अडकणार आहेत. जुलै महिन्यात राधिका मर्चंटशी अनंत अंबानी लग्नगाठ बांधणार आहेत. त्याआधी नुकताच जामनगरमध्ये दोघांचा मोठ्या थाटामाटात प्री-वेडिंग सोहळा पार पडला. १ मार्च ते ३ मार्च असा तीन दिवसांच्या या सोहळ्याला देश-विदेशातून दिग्गज मंडळी उपस्थित राहिली होती. अनंत-राधिकाच्या प्री-वेडिंग सोहळ्याची चर्चा देशासह जगभरात अजूनही सुरू आहे. फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत. अशातच प्री-वेडिंग सोहळ्यात मुकेश अंबानींच्या धाकट्या सूनेने दिलेल्या भाषणात हॉलीवूड चित्रपटातील संवाद कॉपी केल्याचं समोर आलं आहे. यासंबंधित व्हिडीओ सोशल मीडियावर खूपच चर्चेत आला आहे.अनंत अंबानींची होणारी पत्नी राधिका मर्चंट हिने अंबानी कुटुंबासाठी एका भाषणातून भावना व्यक्त केल्या होत्या. मुकेश अंबानींपासून ते श्लोका मेहतापर्यंत अंबानी कुटुंबातील प्रत्येक सदस्याविषयी राधिका बोलली होती. यावेळी तिने होणारे पती अनंत यांच्यासाठी हृदयस्पर्शी भाष्य केलं. जे ऐकून नेटकऱ्यांना एका हॉलीवूड चित्रपटाची आठवण झाली.राधिकाचा हा व्हिडीओ 'सादिक सलीम' या इन्स्टाग्रामवर शेअर करण्यात आला आहे. ज्यामध्ये २००४ साली प्रदर्शित झालेल्या SHALL WE DANCE? या चित्रपटातील संवाद अंबानींच्या होणाऱ्या सूनेने आपल्या भाषणात कॉपी केले आहेत. या चित्रपटात अभिनेत्री सुसान सरंडन हे संवाद म्हणताना दिसत आहेत. तिचे हेच संवाद शब्दशः राधिका बोलताना पाहायला मिळत आहे. 'विटनेस टु योर लाइफ' असं या संवादाचे नाव आहे. राधिकाचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.या व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी राधिकाला ट्रोल केलं आहे. तर काही नेटकऱ्यांनी तिचं समर्थन केलं आहे. एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, 'चॅटजीपीटीने सुद्धा चांगले संवाद लिहून देण्याच काम केलं असतं.' तसंच दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, 'एवढा पैसा खर्च केला. तर एखाद्या संवाद लेखकाला कामासाठी घेऊ शकला असता.' तर तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, 'आता हिला आरामात चित्रपटाच्या ऑफर मिळतील.' अशा अनेक प्रतिक्रिया या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी दिल्या आहेत.दरम्यान, अनंत-राधिका यांच्या प्री-वेडिंग सोहळ्याच्या पहिल्या दिवशी, १ मार्चला जगप्रसिद्ध पॉप स्टार रिहानाचा परफॉर्मन्स झाला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी संगीत सोहळा झाला. यामध्ये बॉलीवूडच्या सेलिब्रिटींनी जबरदस्त परफॉर्मन्स केला. तिसऱ्या दिवशी, ३ मार्चला 'टस्कर ट्रेल्स' आणि 'हस्ताक्षर' कार्यक्रम झाला. 'टस्कर ट्रेल्स' हा आउटडोअर कार्यक्रम होता.

# अमिषा पटेल व्याजासहित पैसे द्यायला तयार



चेक बाऊन्स प्रकरणी गेल्या काही वर्षांपासून अभिनेत्री अमिषा पटेल (AMEESHA PATEL) ही चर्चेत आहे. आता न्यायदंडाधिकारी दिग्विजय नाथ शुक्ला यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली आहे. यावेळी अमिषा पटलेनं तक्रारदाराशी तडजोड करून त्याला व्याजासहित 2.75 कोटी रुपये देण्याचे मान्य केल्याचे सांगण्यात आले.कोर्टातील सुनावणीदरम्यान अमिषा पटेलच्या वकिलाने न्यायालयाला सांगितले की, अमिषा पटेल तक्रारदाराला पाच हप्त्यांमध्ये 2.75 कोटी रुपये देण्यास तयार आहे. याप्रकरणी अंतिम स्तरावर चर्चा सुरू आहे. यावर तक्रारदाराचे वकील विजय लक्ष्मी श्रीवास्तव यांनी सांगितले की, अमिषा पटेल यांना स्वतः हजर राहून तडजोड अर्जावर स्वाक्षरी करावी लागेल. न्यायालयाने अमिषा पटेलला जबाबा नोंदवण्यासाठी कोर्टात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. तक्रारदाराचा जबाब नोंदवल्यानंतरआता अमिषा पटेल आणि कुणाल ग्रुमर यांचा जबाब नोंदवण्यात येणार आहे. यासाठी दोघांनाही न्यायालयात हजर रहावं लागणार आहे.रांचीच्या अरगोरा येथील रहिवासी असलेले चित्रपट निर्माता अजय कुमार सिंह यांनी देसी मॅजिक चित्रपट बनवण्यासाठी अमिषा पटेलला अडीच कोटी रुपये दिले होते, पण या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली नाही. यानंतर अजय कुमार सिंह यांनी अमिषा पटेलकडे पैसे परत मागितले. अमिषानं अजय कुमार सिंह यांना दोन चेक दिले, हे चेक बाऊंस झाले. या प्रकरणी अजय कुमार सिंह यांनी 2018 मध्ये अमिषा पटेल आणि कुणाल ग्रुमर यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर अमिषा पटेलने 17 जून रोजी रांची दिवाणी न्यायालयात आत्मसमर्पण केले होते. सध्या अमिषा ही जामिनावर आहे. अमिषा पटेलचा गदर-2 हा चित्रपट गेल्या वर्षी प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर रेकॉर्ड ब्रेक कमाई केली आहे. आता अमिषाच्या आगामी चित्रपटांची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.चेक बाऊन्स प्रकरणी गेल्या काही वर्षांपासून अभिनेत्री अमिषा पटेल (AMEESHA PATEL) ही चर्चेत आहे. आता न्यायदंडाधिकारी दिग्विजय नाथ शुक्ला यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली आहे. यावेळी अमिषा पटलेनं तक्रारदाराशी तडजोड करून त्याला व्याजासहित 2.75 कोटी रुपये देण्याचे मान्य केल्याचे सांगण्यात आले. कोर्टातील सुनावणीदरम्यान अमिषा पटेलच्या वकिलाने न्यायालयाला सांगितले की, अमिषा पटेल तक्रारदाराला पाच हप्त्यांमध्ये 2.75 कोटी रुपये देण्यास तयार आहे. याप्रकरणी अंतिम स्तरावर चर्चा सुरू आहे. यावर तक्रारदाराचे वकील विजय लक्ष्मी श्रीवास्तव यांनी सांगितले की, अमिषा पटेल यांना स्वतः हजर राहून तडजोड अर्जावर स्वाक्षरी करावी लागेल.

# भुवनेश्वर कुमार इज बॅक!

## सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीत हॅटट्रिक घेत विजय मिळवून दिला

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारतीय क्रिकेट संघातून बाहेर असलेल्या भुवनेश्वर कुमारने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीत चमकदार कामगिरी केली आहे. काही दिवसांपूर्वीच आयपीएल लिलावादरम्यान त्याला मोठ्या किमतीत खरेदी करण्यात आले होते आणि आता त्याने हॅटट्रिक घेत खळबळ उडवून दिली आहे. भुवीची टी-२० क्रिकेटमधील ही पहिली हॅट्रिक आहे. या हॅट्रिकसह भुवनेश्वर कुमारने आपल्या गोलंदाजीची चमक दाखवून दिली आहे.**




उत्तर प्रदेशकडून खेळणाऱ्या भुवनेश्वर कुमारने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये झारखंडविरुद्ध हॅटट्रिक घेतली. भुवनेश्वर कुमारने १७ व्या षटकात हा पराक्रम केला. या षटकाच्या पहिल्या तीन चेंडूंवर भुवनेश्वर कुमारने लागोपाठ विकेट घेतल्या आणि एकही धाव दिली नाही. सामन्याच्या १७व्या षटकात भुवनेश्वर कुमार गोलंदाजीसाठी आला तोपर्यंत झारखंडच्या संघाने ११६ धावा केल्या होत्या. षटकाच्या पहिल्याच चेंडूवर त्याने ११ धावा करणाऱ्या रॉबिन मिंजला बाद केले. त्याच षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर त्याने खाते न उघडताच बाळकृष्णला माघारी धाडले. यानंतर तिसऱ्या चेंडूवर त्याने विवेकानंद तिवारीला बाद केले. त्यालाही आपले खाते उघडता आले नाही.प्रथम फलंदाजी करताना उत्तर प्रदेश संघाने २० षटकांत १६० धावा केल्या. संघाकडून एकही अर्धशतक झाले नाही, पण रिंकू सिंगने नक्कीच २८ चेंडूत ४५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. यानंतर झारखंड संघ लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरला, तेव्हा संपूर्ण संघ केवळ १५० धावाच करू शकला आणि सर्वबाद झाला. अशाप्रकारे उत्तर प्रदेशने हा सामना १० धावांनी जिंकला. एकेकाळी झारखंडचा संघ विजयाच्या दिशेने जात असल्याचे दिसत होते, मात्र भुवनेश्वर कुमारच्या शानदार गोलंदाजीनंतर झारखंडचा संघ बॅकफूटवर गेला.जवळपास १० वर्षे आयपीएलमध्ये SRH म्हणजेच सनरायझर्स हैदराबादकडून खेळणाऱ्या भुवनेश्वर कुमारचा संघ यावेळी बदलला आहे. गेल्या वर्षापर्यंत त्याला हैदराबादकडून खेळताना ४.२० कोटी रुपये मिळत होते. मात्र यावेळी त्याच्यावर तगडी बोली लागली. जेव्हा त्याचे नाव २ कोटी रुपयांच्या मूळ किमतीत पुकारले गेले तेव्हा मुंबई इंडियन्सने त्याच्यावर पहिली बोली लावली. यानंतर, लखनौ आणि मुंबई यांच्यातील बराच काळ बोली लावण्याची स्पर्धा होती. हळूहळू त्याच्या किमतीने १० कोटींचा टप्पा ओलांडला. यानंतर, आरसीबीने अचानक लिलावाच्या मैदानात उडी घेतली आणि १०.७५ कोटींना त्याला संघात सामील केले.उत्तर प्रदेशकडून खेळणाऱ्या भुवनेश्वर कुमारने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये झारखंडविरुद्ध हॅटट्रिक घेतली. भुवनेश्वर कुमारने १७ व्या षटकात हा पराक्रम केला. या षटकाच्या पहिल्या तीन चेंडूंवर भुवनेश्वर कुमारने लागोपाठ विकेट घेतल्या आणि एकही धाव दिली नाही. सामन्याच्या १७व्या षटकात भुवनेश्वर कुमार गोलंदाजीसाठी आला तोपर्यंत झारखंडच्या संघाने ११६ धावा केल्या होत्या. षटकाच्या पहिल्याच चेंडूवर त्याने ११ धावा करणाऱ्या रॉबिन मिंजला बाद केले. त्याच षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर त्याने खाते न उघडताच बाळकृष्णला माघारी धाडले. यानंतर तिसऱ्या चेंडूवर त्याने विवेकानंद तिवारीला बाद केले. त्यालाही आपले खाते उघडता आले नाही.

### भुवनेश्वरसाठी 10 कोटींची बोली

प्रथम फलंदाजी करताना उत्तर प्रदेश संघाने २० षटकांत १६० धावा केल्या. संघाकडून एकही अर्धशतक झाले नाही, पण रिंकू सिंगने नक्कीच २८ चेंडूत ४५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. यानंतर झारखंड संघ लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरला, तेव्हा संपूर्ण संघ केवळ १५० धावाच करू शकला आणि सर्वबाद झाला. अशाप्रकारे उत्तर प्रदेशने हा सामना १० धावांनी जिंकला. एकेकाळी झारखंडचा संघ विजयाच्या दिशेने जात असल्याचे दिसत होते, मात्र भुवनेश्वर कुमारच्या शानदार गोलंदाजीनंतर झारखंडचा संघ बॅकफूटवर गेला.जवळपास १० वर्षे आयपीएलमध्ये SRH म्हणजेच सनरायझर्स हैदराबादकडून खेळणाऱ्या भुवनेश्वर कुमारचा संघ यावेळी बदलला आहे. गेल्या वर्षापर्यंत त्याला हैदराबादकडून खेळताना ४.२० कोटी रुपये मिळत होते.

# ॲडलेड कसोटीत सलामीला कोण उतरणार?

## केएल राहुल हा यशस्वी जैस्वालबरोबर सलामीला उतरणार

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारत वि ऑस्ट्रेलिया ॲडलेड कसोटीपूर्वी भारताचा नियमित कर्णधार आणि सलामीवीर रोहित शर्मा भारतीय संघात दाखल झाला आहे. रोहित शर्मा वैयक्तिक कारणांमुळे पहिल्या कसोटीसाठी ऑस्ट्रेलियात पोहोचला नव्हता. रोहितच्या अनुपस्थितीत केएल राहुलने यशस्वी जैस्वालबरोबर सलामीवीराची भूमिका पार पाडली होती. आता रोहित शर्मा संघात दाखल झाल्यानंतर सलामीला कोण उतरणार हा प्रश्न होता. यावर रोहित शर्मानि स्पष्ट उत्तर दिलं आहे.**







रोहित शर्मानि दुसऱ्या कसोटीपूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत मोठा निर्णय जाहीर करत सांगितले की, केएल राहुल हा यशस्वी जैस्वालबरोबर सलामीला उतरणार आहे. तर कर्णधार रोहित शर्मा मधल्या फळीत फलंदाजी करेल. रोहित शर्माच्या अनुपस्थितीत, केएल राहुलने पर्थ कसोटीत सलामी दिली होती, जिथे त्याने दुसऱ्या डावात ७७ धावांची उत्कृष्ट खेळी केली. राहुलची ती खेळी पाहून रोहित शर्मानि आपल्या सलामीच्या जागेचा त्याग केला असून आता तो संघाच्या भल्यासाठी इतर क्रमांकावर फलंदाजी करेल.रोहित शर्मा म्हणाला, "हो तो (केएल राहुल) सलामीसाठी उतरेल, मी कुठेतरी मधल्या फळीत फलंदाजीसाठी उतरेन." यानंतर सलामीवीर केएल राहुलच्या फलंदाजीचे कौतुक करताना रोहित शर्मा म्हणाला, "मी राहुलला घरी असताना फलंदाजी करताना पाहिलं, त्याने अप्रतिम फलंदाजी केली. त्यामुळे आता सलामीच्या जोडीत विदेशी खेळपट्ट्यांवर केएल राहुल ज्या प्रकार फलंदाजी करतो, त्यामुळे सलामीवीराची जबाबदारी त्याला देणं स्वाभाविक आहे.

### शुबमन गिल तिसऱ्या क्रमांकावर

सध्या तो कोणत्या नंबरवर फलंदाजीसाठी उतरणार हे अजून निश्चित झालेलं नाही. रोहितने सांगितले की तो मध्यल्या फळीत फलंदाजीसाठी उतरेल. टॉप ४ फलंदाज मात्र निश्चित झाले आहेत. यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुल पहिल्या दोन क्रमांकावर असतील. त्यानंतर शुबमन गिल तिसऱ्या क्रमांकावर खेळेल. विराट कोहली चौथ्या क्रमांकावर असेल. रोहित शर्मा पाचव्या किंवा सहाव्या स्थानावर खेळू शकतो.